शोधप्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

"बुध्द तत्वज्ञान आणि धर्मांतरित स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात झालेला बदल - एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत **समाजशास्त्र** विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा
प्रस्तावित आराखडा

: संशोधिका :
सावंत संगिता संभाजी

: मार्गदर्शक :
डॉ.चव्हाण ज्ञानेश्वर शेषराव
एम.ए., एम.फील., पीएच.डी.
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी

ऑगस्ट २०२३

"बुध्द तत्वज्ञान आणि धर्मांतरित स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात झालेला बदल - एक समाजशास्त्रीय अध्ययन"

(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

अनुक्रमणिका

प्रास्ताविक १

संशोधन साहित्याचा आढावा ४

संशोधनाचा आराखडा ४

संशोधन अध्ययनाचे महत्व ४

संशोधन समस्या ५

संशोधनाची उद्दिष्टे ६

संशोधनाची गृहितकृत्ये ६

संशोधन क्षेत्र ७

नमुना निवड पद्धती ८

अध्ययनाची मर्यादा ८

तथ्य संकलन : तंत्र व पध्दती ९

अध्यनाची व्याप्ती ९

संशोधनाची रूपरेषा...९

"बुध्द तत्वज्ञान आणि धर्मांतरित स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात झालेला बदल - एक समाजशास्त्रीय अध्ययन"

(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

प्रास्ताविक :

सिंधू संस्कृतीच्या अस्तानंतर वैदिक संस्कृतीचा उदय झाला. नंतर वैदिक संस्कृतीच्या चार अवस्थामध्ये ऋग्वेदकाल, ब्राम्हणकाल, उपनिषद्काल, महाकाव्य व पुराणकाल हे इ.स. पूर्व १५०० ते इ.स. पूर्व ३०० पर्यंत कालखंड ओळखला जातो.

या काळात नितिकल्पना - नितिमतेला धर्मात व समाजात उच्च स्थान होते. सत्याचा पुरस्कार व मिथ्थाचा तिरस्कार करण्यात येत असे. आध्यात्मिक साधनेद्वारा आत्माचा विकास करून आत्मानंद उपभोगण्याला त्याच्या धर्मात स्थान नव्हते.

यज्ञामुळे कला, शास्त्रे व तत्वज्ञानाचा विकास होऊन शल्य, ज्योतिष वगैरे शास्त्रांचा सुद्धा याज्ञिक आवश्यकतेमुळे विकास झाला. यज्ञप्रसंगी जमलेल्या विद्वानाच्या तात्विक वादविवादातून तत्वे उदयास येवून पुढे उपनिषद तत्वज्ञानाचा उदय झाला. याच काळात स्त्रीस्वांतत्र्य मर्यादित झाले. तरीपण स्त्रियांना धार्मिक व सामाजिक समारंभात व कुंटुबात मानाचे स्थान होते. त्यामुळे गार्गी व मैत्रेयीसारख्या विद्वान महिला असून पुरुषाबरोबर वादविवादात भाग घेत असत. स्त्रियांचा, नृत्य, गायन, वादन वगैरेसाठी उपयोगामुळे त्यांचे पतन होवू लागले.

उपनिषद काळाच्या अंतिम काळात महाकाव्ये व पुराणे यांचा विकास झाला. नंतर इ.स. पूर्व सहावे शतक भारताच्या व जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. या शतकात धर्मप्रवाहाचा उगम होवून जैन व बौद्ध धर्मासारखे जगप्रसिध्द धर्म उदयास आले.

बुद्ध तत्वज्ञान हे जगाच्या पाठीवरचे पहिले इहवादी, समतेचे, न्यायाचे, बंधुतेचे तत्वज्ञान आहे. बुद्धाचे तत्वज्ञान हे कल्पना विलासी नव्हते तर वास्तवादी होते. मानवी जीवनात उत्कट असा समतोल निर्माण झाला पाहिजे हे त्यांचे ब्रीद आहे.

गौतम बुद्धांचे तत्वज्ञान हे माणुस केंद्रीत होते. बुद्ध तत्वज्ञान व्यवस्था परिवर्तनाचा मुलधार वैचारिक जागृतीतून सामाजिक परिवर्तन घडून येते. ही संकल्पना तथागत गौतम बुद्धांनी जवळपास ३००० वर्षापूर्वी शक्य करुन दाखविली. म्हणून त्यांना जगातील पहिले महान तत्वज्ञ संशोधक संबोधले जाते.

गौतम बुद्धांचा धम्म हा प्रज्ञा, शील आणि करुणा या उच्च तत्वांवर सदधम्मचे अधिष्ठान आहे. ही तत्वे धम्माच्या तत्वज्ञानाचे आधारस्तंभ आहेत. प्रज्ञा, शिल, करुणा यांचा बुद्धी, मन आणि सहृदयातून स्त्रोत असतो. धम्म तत्वज्ञानातून तथागतांनी जगाला अंहिसा व शांतीचा महामार्ग दाखविला. प्रज्ञा प्राप्तीने धम्म विवेकवादी, शीलाच्या प्रत्यक्ष आचरणाने तो नितिवादी आणि करुणाच्या आचरणाने तो मानवतावादी बनला. धम्म हा विवेकवादी, नितीवादी आणि मानवतावादाची कास धारणा आहे.

बौद्ध धम्माचे तत्वज्ञान हे चार आर्यसत्य त्रिरत्ने, अष्टांगीक मार्ग व दहा पारमिता यावर आधारलेले आहे.

चार आर्य सत्य : १) दुःख २) दुःखसमुदाय ३) दुखविरोध ४) दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा

अष्टांगिक मार्ग :

१) सम्यक दृष्टी, २) सम्यक संकल्प, ३) सम्यक वाणी ४) सम्यक कर्म ५) सम्यक अर्जन, ६) सम्यक प्रयत्न ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी

बौद्ध वाङमय :

त्रिपिटक : १) विनयपिटक २) सुत्तपिटक, ३) अभिधम्मपिटक

इतर भाषेतील ग्रंथ :

सिलोनमधील दीपवंश व महावंश, मिलीदप्रश्न, नेतिप्रकर, ललितविहार, मंजूश्री इत्यादी ग्रंथ.

मुलीना शिकविले पाहिजे हा डॉ.आंबेडकराचा आग्रह होता. स्त्रीने शिकावे, तिने स्वाभिमानाने जगावे, आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य तिला असावे. स्त्री व्यक्ती आहे. माणूस आहे. विवाहानंतर पत्नी ही पुरुषाची समान अधिकारी असली पाहिजे. ती नवऱ्याची गुलाम असता कामा नये. अस्पृश्य स्त्रियांचे मनोबल वाढले पाहिजे. जात आणि विद्या या गोष्टी स्त्रियानाही आवश्यक आहेत.

स्त्रीजात ही समाजाचा अलंकार आहे. आपली होणारी गृहणी उत्तम कुळातील असावी अशी प्रत्येकजन अपेक्षा करतो. तशी पत्नी मिळावी म्हणूज खटपट करतो.

बौद्ध धम्म स्वीकारल्यामुळे धर्मांतरित स्त्रियांचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनात झालेला बदल दिसून येतो. बौद्ध समाजातील स्त्रियांच्या स्वाभिमानात वाढ झाली. त्यांच्यात माणूसपणाची जाणीव निर्माण झाली. मी सुद्धा एक माणूस असून मला माणूसकीने, सन्मानाने मूलभूत अधिकार मिळालेच पाहिजे अशी स्वत्वाची भावना धर्मांतरित स्त्रियांमध्ये निर्माण झाली. अस्मितादर्शक जिणे हा बौद्ध धम्म स्विकारण्याचा परिणाम आहे. अशा प्रकारे धर्मांतरित स्त्रियांमध्ये फार मोठे मानसिक परिवर्तन झालेले दिसून येते. अंगात देव येणे बंद झाले. मासांहार, दारूचा कित्येकानी त्याग केला. गावकीची कामे सोडून इतर कामे करू लागली. बौद्ध समाजातील स्त्रिया आपल्या मुला-मुलींना शाळेत शिकवू लागला. शिक्षणामुळे जागृती येवून बौद्ध समाजातील स्त्रियांत राजकीय जागृती आली. बौद्ध स्त्रियांची सांस्कृतिक प्रतीके बदलली.

थोडक्यात असे, म्हणता येईल, बुद्ध धम्म स्वीकारामुळे नवबौद्धात व स्त्रियात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आमुलाग्र बदल झालेले आहेत. ज्यामुळे समाजाची व समाजातील स्त्रियांची उंची तर वाढली (प्रगती) पण भारताचा देखील सन्मान जगभर वाढलेला दिसून येतो.

संशोधन साहित्याचा आढावा

राहुल सांस्कृत्यायन, मामा देशमुख, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, नलिनी पंडित, कुलकर्णी, डॉ.भदन्त आनंद कौशल्य, भाऊ लोखंडे, डॉ.रामचंद्र भिसे, पंजाब चव्हान या विचारवंतानी आणि संपादकानी जे संशोधनपर लेखन करून विचार मांडले आहेत. त्या सर्वांचा माझा संशोधन विषयाचा अनुसंधान आढावा घेवून लिखान करण्यात येईल.

डॉ. यशवंत मनोहर यांच्या मते "बुद्धाने त्या काळी स्त्रीला ज्ञानाचे स्वयंमुक्तीचे आणि स्वंयम विकासाचे सर्व हक्क दिले होते. पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी १४ ऑक्टोबर १९५६ ला धर्मांतर करून भारतीय समाजात अस्पृश्य म्हणून सर्व विकासापासून वंचित ठेवलेल्या समाजाला व त्या समाजातील स्त्रियांना सर्वांगिण विकासाचा आणि समृग्र मुक्तीचा विचार फुलत ठेवला आहे."

संशोधनाचा आराखडा :

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करून संशोधन पूर्ण केले जाईल.

संशोधन अध्ययनाचे महत्व :

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांचे स्थान हे निम्न दर्जाचे आहे. अंधश्रध्दा, अनिष्ठ प्रथा, रुढी-परंपराचा ज्या समाजावर प्रभाव असतो तो समाज प्रगतीच्या दृष्टीने मागास असतो. त्या मागासलेपणाची कारणे शोधणे महत्त्वाचे वाटते. बौध्द धर्मातील स्त्रिया ह्या शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत. इतर समाजाच्या तुलनेत त्यांचा विकास झालेला नाही. त्यांच्यावर बौध्द तत्वज्ञानाचा प्रभाव किती प्रमाणात पडला आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

१९५६ पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या चळवळीतून बौध्द समाज हा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय दृष्टीकोणातून जागृत झाला आहे. त्याला स्वत्वाची जाणीव झाली आहे. तो स्वतःच्या अस्मितेचा शोध घेवून, समाजात आपली स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण करताना दिसून येतो आहे. प्रत्येक समाजाच्या सर्वांगिण

जडणघडणीत त्या समाजातील स्त्रियांचा सहभाग हा महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे बौध्द समाजातील धर्मातील स्त्रियांनी स्वतः स्वयंस्फूर्तीने धर्मांतरित स्त्रियांचे स्वतंत्र मंडळे निर्माण करतात. बौध्द संस्कृतीला समग्र बौध्द कुटुंब आणि समाजात रुजविण्याचे कार्य केले आहे. आणि त्याचाच परिणाम गेली तीन दशके बौध्द मुल त्याच पध्दतीने स्वतःचे सांस्कृतिक समाजीकरणाच्या वातावरणात लहानाची मोठी झाल्याने त्या तरुण मुला-मुलींमध्ये बौध्द संस्कृती ही समुळ रुजलेली निदर्शनास येताना दिसते.

कोणत्याही समाजाचा दर्जा हा त्या समाजातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असतो. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. म्हणून त्यांना समाजव्यवस्थेमध्ये दुय्यम दर्जाचे स्थान आहे. इतर समाजाच्या समाजातील स्त्रियांचा विकास हा भारत देश स्वातंत्र्यानंतर झालेला आढळून येतो. बौद्ध समाजातील स्त्रियांचे जीवन कशा पद्धतीचे आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणे, संशोधनासाठी महत्वपूर्ण वाटले. प्रत्येक समाजात त्याचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन हे महत्वाचे असते. याचा विचार करून बौद्ध समाजातील स्त्रियांचा सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर बौद्ध तत्वज्ञानाचा कशा पद्धतीने प्रभाव पडलेला आहे हे अभ्यास करणे आवश्यक व गरजेचे वाटते आणि हा अभ्यास समाजशात्रीय पद्धतीने करून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधन समस्या :

प्रस्तुत संशोधन हे बौध्द समाजातील स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन आहे. आजपर्यंत अभ्यासकांकडून बौध्द समाजातील वेगवेगळया समस्यावर कमी अधिक प्रमाणात अध्ययन झालेले आहे. सदरील संशोधन देखील बौध्द धर्मांतरीत स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदल किंवा परिवर्तनाचा प्रामुख्याने विश्लेषण करणारे आहे.

कोणत्याही सामाजाचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्या समाजातील स्त्री असते. प्रत्येक समाजाचा विकास त्या स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतो. प्रस्तुत संशोधनामध्ये

परभणी जिल्ह्यातील बौध्द समाजातील स्त्रियांच्या सांस्कृतिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन करून त्यांची शास्त्रशुध्द माहिती घेऊन तथ्य संकलित केली जाणार आहेत.

प्रस्तुत संशोधन आराखड्याचे स्वरुप वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. प्रत्येक संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनीय तत्व व वास्तविकता हा असतो. म्हणूनच संशोधिकेने सदरील संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा पध्दतीची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) धर्मांतरित बौद्ध स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा अभ्यास करणे

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या धर्मांतराचा धर्मातरित स्त्रियांवर पडलेला प्रभाव तपासणे. त्याचा अभ्यास करणे.

३) धर्मातरानंतर निर्माण झालेल्या अडचणी किंवा अडथळयाची चिकित्सा करणे.

४) धर्मांतरानंतर बौद्ध स्त्रियांमध्ये निर्माण झालेल्या मानवतावादी मुल्याची तात्विक चिकित्सा करणे.

५) बौद्ध स्त्रियांच्या सर्वांगीन विकासाचा आढावा घेणे.

६) धर्मांतरित बौद्ध स्त्रियांच्या कुटूंबातील सांस्कृतिक वर्तनाचा अभ्यास करणे-

७) धर्मांतरानंतर बौद्ध स्त्रियांची झालेली शैक्षणीक प्रगती समजून घेणे.

८) धर्मांतरानंतर बौद्ध स्त्री आणि बुध्द तत्वज्ञानाचा प्रभाव यांचा तुलनात्मक आढावा घेणे.

९) बौद्ध तत्वज्ञानातील लोकशाही मुल्यांची भारतीय समाजातील व्यवहारिकता तपासणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

संशोधकाचे स्वतःचे ज्ञान, अनुभव, व्यक्तिगत पात्रता यास अनुसरून समस्या सोडविण्यासाठी संभावित केलेले अनुमानित विधान म्हणजे 'गृहितकृत्ये' होय. त्यानुसार पुढील प्रमाणे आहेत.

१) धर्मांतरित बौद्ध स्त्रियांनी भारतीय समाजव्यवस्थेमध्ये एक नवी सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे.

२) धर्मांतराच्या प्रभावातून बौद्ध स्त्रियांमध्ये उच्च शिक्षणाची ओढ निर्माण झालेली आहे.

३) धर्मांतराच्या सांस्कृतिक बदलातून बौद्ध स्त्रियांमध्ये शुद्ध मानवतावादाची प्रस्तापणा निर्माण झाली आहे.

४) धर्मांतरित बौद्ध स्त्रिया इतर समाजातील स्त्रियांसाठी सामाजिक विकासाच्या प्रेरणास्त्रोत झालेल्या आहेत.

५) धर्मांतरित बौद्ध स्त्रियांच्या नातेसंबंधामध्ये अधुनिक पुरोगामी विचाराचा अवलंब करताना आढळून येतात.

६) धर्मांतरित बौद्ध स्त्रियांनी पारंपारिक जिवनमुल्य नाकारून समता, स्वातंत्र आणि बंधुभाव या मूल्यांना आपल्या जिवनात महत्त्वपूर्ण स्थान दिल्याचे दिसुन येते.

७) बौद्ध तत्वज्ञानानील, प्रज्ञा, शिल, करुणा या मुल्यांची सांस्कृतीक दृष्टीकोणातून धर्मांतरित बौद्ध स्त्रियांनी आपल्या आचारणात अतिशय महत्व देतात.

८) धर्मांतरित बौध्द स्त्रिया अंधश्रध्देतून मुक्त होऊन विज्ञानवादाची कास धरतांना दिसतात.

संशोधन क्षेत्र :

प्रस्तुत अध्ययनासाठी परभणी जिल्हाची निवड करण्यात आली असून त्यामध्ये, "बुद्ध तत्वज्ञान आणि धर्मांतरित बौद्ध स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जिवनात झालेला बदल" याचे समाजशास्त्रीय अध्ययन करणे हा प्रस्तुत संशोधनाच्या मुख्य हेतू आहे. (संशोधनाची मर्यादाही धर्मांतरित स्त्रियांच्या सांस्कृतिक बदलापूर्तीच मर्यादित राहील.)

नमुना निवड पद्धती

तथ्य संकलनासाठी गैरसंभाव्यता किंवा असंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. असंभाव्यता नमुना निवड म्हणजे संशोधक आपल्या व्यक्तीगत निर्णयानुसार जन संख्येचे प्रतिनिधीत्व करू शकेल अशा उत्तरदात्याची निवड करत असतो. त्यास असंभाव्यता नमुना निवड असे म्हणतात. यामुळे संशोधकाचा वेळ व खर्चाची बचत होऊन संशोधन कार्य करण्यास सोयीचे होते.

असंभाव्यता नमुना निवडीमध्ये सहेतूक नमुना निवड पध्दती, माझ्या संशोधन समस्येच्या दृष्टीने तथ्य संकलनासाठी अत्यंत उपयुक्त असल्याने मी सहेतूक नमुना निवड पध्दतीला प्राधान्य देऊन उत्तरदात्याची निवड करणार आहे. जेणेकरून माझ्या संशोधन कार्यात या पध्दतीमुळे सुसाह्यता निर्माण होऊ शकेल व तथ्य संकलनाला गती मिळू शकेल.

सदरील संशोधन परभणी जिल्ह्यातील धर्मांतरित स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलाच्या अनुषंगाने हाती घेण्यात आले आहे. तेव्हा परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील आणि ग्रामीण भागातून उत्तरदात्यांपर्यंत सदरील नमुना निवड प्रक्रियेमुळे पोहोचणे सहज शक्य होऊ शकते व संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करता येऊ शकते.

परभणी तालुक्यातून ५० तर ८ तालुक्यातून प्रत्येकी २५ उत्तरदात्याची निवड करण्यात येईल. या पध्दतीचा वापर करून लोकसंख्येच्या आधारावर २५० स्त्रियांची उत्तरदाता म्हणून निवड करण्यात येईल.

अध्ययनाची मर्यादा :

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक, द्वितीय व तथ्य सामुग्रीवर आधारित आहे. संशोधन कार्य परभणी जिल्हा पुरतेच मर्यादित आहे. संशोधनाची मर्यादा ही धर्मांतरित स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलापुर्तीच मर्यादित आहे. बाकी विषय संशोधन समस्येचा विश्लेषणानुसार येतील किंवा येणार नाही. ही संशोधनाची मर्यादा आहे.

तथ्य संकलन : तंत्र व पध्दती

अ) प्राथमिक सामुग्री :

यामध्ये परभणी जिल्हातील स्त्रियांची मुलाखत निरिक्षण या तंत्राचा वापर करून माहिती संकलित केली जाईल. तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षण करून आकडेवारी गोळा करण्यात येईल.

ब) दुय्यम सामुग्री :

यामध्ये प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी निरनिराळ्या ग्रंथालयांना भेटी देऊन विषयांचे संदर्भग्रंथ मिळविले जातील. त्याचबरोबर शासकीय अहवाल, रेकॉर्ड, वर्तमानपत्र, साप्ताहिक, मासिके, नियतकालिके सरकारी दप्तरातील माहिती, विविध संघटनांचे अहवाल या दुय्यम सामुग्रीचा उपयोग करून माहिती संकलित केली जाईल.

क) तथ्य विश्लेषण (संस्करण)

प्रस्तुत अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सारणीकरण, वर्गीकरण, विश्लेषण करण्यात येईल. त्या आधारे अहवालाची मांडणी करण्यात येईल. संशोधन पद्धतीनुसार योग्य निष्कर्ष मांडले जातील.

नवबौद्ध समाजातील स्त्री जीवनातील प्रश्न, समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने योग्य उपाययोजनाही मांडल्या जातील.

अध्यनाची व्याप्ती :

प्रस्तुत अध्ययन नवबौद्ध स्त्रियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात झालेला बदल संदर्भाअंतर्गत मर्यादित राहील.

संशोधनाची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधनाची विभागणी पुढील सहा प्रकरणामध्ये केलेली आहे.

१) प्रस्तावना

२) संशोधन पद्धती व पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

३) नवबौद्ध स्त्रीयांचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे विश्लेषण

४) नवबौद्ध समाजातील स्त्रीयांचे धार्मिक, सांस्कृतिक जीवन बदलाचे विश्लेषण

५) नवबौध्द स्त्रियांचे शैक्षणिक आणि आरोग्यविषयक स्थिती

६) संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण — १ : प्रस्तावना

या प्रकरणात विषयाचे प्रास्ताविक मांडून संशोधन विषयाचे महत्व स्पष्ट करण्यात येईल. त्याचप्रमाणे संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडण्यामागील उद्देश स्पष्ट करून संशोधनाची उदिष्ट्ये व गृहितकृत्याची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण — २ : संशोधन पद्धती व पूर्व संशोधन साहित्याचा आढावा.

या प्रकरणात संशोधन पध्दती व संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतला जाईल. यामध्ये संबंधित साहित्यात संदर्भग्रंथ, मासिके, विश्वकोश, ज्ञान कोश, शासकीय प्रकाशने यांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण - ३ : नवबौद्ध स्त्रीयांचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे विश्लेषण

या प्रकरणात परभणी जिल्हातील नवबौद समाजातील स्त्रियांना कुटूंबात मिळणारे स्थान, कुटुंबात निर्णय प्रक्रियेत मिळणारे स्थान, राहनीमान, दर्जा, नातेसंबंध इत्यादींचा वेध घेतला जाणार आहे. तसेच नवबौध्द समाजातील प्रथा, परंपरा, उत्सव, विधि, सामाजिक प्रश्न, समस्या, इत्यादीचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण-४ : नवबौद्ध समाजातील स्त्रीयांचे धार्मिक, सांस्कृतिक जीवन बदलाचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात बुद्ध तत्वज्ञान व त्याचे महत्व तसेच परभणी जिल्हातील नवबौद्ध समाजातील स्त्रीयांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण - ५ : नवबौध्द स्त्रियांचे शैक्षणिक आणि आरोग्यविषयक स्थिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये परभणी जिल्हातील नवबौद्ध स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक प्रश्नांचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण - ६ : संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत सहाव्या प्रकरणामध्ये माहितीचे संकलन केल्यानंतर त्यातून प्राप्त झालेल्या तथ्यांवर प्रक्रिया करुन निष्कर्ष काढले जातील. त्यानुसार गृहितकृत्यांची पडताळणी केली जाईल व संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाच्या आधारावर शिफारशी सुचविल्या जातील.

संदर्भ ग्रंथसूची :

१. अन्नदाते शशिकांत व अन्नदाते स्वाती, "संशोधन पध्दती", के. सागर प्रकाशन, पुणे.

२. आंबेडकर बाबासाहेब (२०१५), "धर्मांतर का?", मिलींद प्रकाशन, वर्धा.

३. आंबेडकर भिमराव रामजी (२०२३), "भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म", बुध्दीष्ट रिसर्च असोसिएशन, नांदेड.

४. आगलावे प्रदिप (२०००), "संशोधन पद्धतीशास्त्र आणि तंत्र", विद्या प्रकाशन, नागपूर.

५. आगलावे प्रदिप (२०१६), "सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६. इंगळे रामचंद्र डमकाजी (१९८६), "महाराचा सांस्कृतिक इतिहास", अभिजित प्रकाशन, नागपूर.

७. कौशल्यायन भदन्त आनंद (२०१०), "पालि-हिंदी शब्द कोश", बुध्दभूमि प्रकाशन, नागपूर.

८. चव्हाण पंजाब, भिसे रामचंद्र, जवळगे हनुमन (२०१३), "भारतातील बौद्ध धम्माची चळवळ", अवन प्रकाशन, दिल्ली.

९. धर्मकिर्ती भदंत, "शील-समाधी-प्रज्ञा", सुगन प्रकाशन, नागपूर.

१०. बोधनकर सुधीर (२०२१), "सामाजिक संशोधन पध्दती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

११. भिसे रामचंद्र, चव्हाण पंजाब, जवळगे हनुमन (२०१२), "बुद्ध तत्वज्ञान", अवन प्रकाशन, दिल्ली.

१२. महास्थवीर भदन्त सदानंद (२०१४), "मिलींद प्रश्न", प्रबुध्द भारत प्रकाशन, नागपूर.

१३. लोखंडे भाऊ (२०१५),"मनोवैज्ञानिक भगवान बुद्ध आणि विपश्यना", सुधीर प्रकाशन, वर्धा

१४. सांस्कृत्यायन महापंडित राहुल (२०१८), "विनय पिटक", साम्यक प्रकाशन, नई दिल्ली.

१५. सांस्कृत्यायन राहुल (२०१९), "बौद्ध संस्कृति", साम्यक प्रकाशन, नई दिल्ली.

संशोधिका

सावंत संगिता संभाजी

मार्गदर्शक

डॉ.चव्हाण ज्ञानेश्वर शेषराव
समाजशास्त्र विभागप्रमुख
शारदा महाविद्यालय, परभणी